मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# शहरातील प्रलंबित विकास कामांसाठी अजितदादा 'ॲक्शन मोड'मध्ये..!

## जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्तांच्या उपस्थितीत आढावा बैठक

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।**

पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाची सूत्रे स्विकारताच उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी पिंपरी-चिंचवड शहरातील प्रलंबित विकास कामे मार्गी लावण्याची आग्रही भूमिका घेत प्रमुख अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पुणे येथील सर्किट हाऊसमध्ये बैठक घेतली.



या बैठकीमध्ये पाणी, ड्रेनेज, ट्रॅफिकच्या समस्येसह शहरातील विविध प्रलंबित विकासकामांचा आढावा घेत सर्व कामे तात्काळ मार्गी लावण्याचे आदेश दिले. पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी शुक्रवारी सूत्रे स्विकारली. यानंतर दुसऱ्याच दिवशी शनिवारी (दि.१४) विभागीय आयुक्त सौरभ राव, जिल्हाधिकारी राजेश देशमुख, पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह, पुणे महापालिका आयुक्त विकास कुमार यांच्यासह प्रमुख अधिकाऱ्यांसह आमदार अण्णा बनसोडे, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे व इतर प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या आढावा बैठकीदरम्यान अजितदादा पवार यांनी पिंपरी-चिंचवड शहरातील प्रमुख प्रकल्पांची स्थिती, प्रलंबित विकासकामे, पाणीटंचाई, ड्रेनेज समस्या, वाहतूकीच्या समस्या, स्वच्छता यासह विविध विषयांची सखोल माहिती घेऊन चर्चा केली. व प्रलंबित विकासकामे मार्गी लावण्याचे आदेश दिले. दरम्यान, उपस्थितांना बोलताना अजितदादा म्हणाले, पिंपरी-चिंचवडची रखडलेली कामे तात्काळ मार्गी लावताना कोणतीही चुकीची कामे खपवून घेतली जाणार नाहीत. चुकीच्या कामांना मी कधीच थारा दिलेला नसून नागरिकांच्या समस्या तात्काळ सोडवितानाच शहराच्या भविष्याचा विचार करून विकासकामांचे नियोजन करण्याचेही आदेश यावेळी अजितदादांनी दिले. पालकमंत्रीपदाची सूत्रे स्विकारताच २४ तासांच्या आतच दादा ॲक्शन मोडमध्ये आल्याने तसेच पिंपरी-चिंचवड शहराच्या विकासावर लक्ष केंद्रित केल्यामुळे शहरातील अनेक प्रकल्प मार्गी लागण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# पारंपारिक कपडे भाडेतत्त्वावर घेण्याचा ट्रेंड कायम!

## नवरीत्रोत्सवानिमित्त दांडिया, गरबाचे क्लासेस सुरू

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।**

नवरात्रोत्सवात दांडिया आणि गरबा विशेष आकर्षण असते. त्याची तयारी आठ दिवस आधीपासूनच सुरु होते.नवरात्रातील नऊ दिवस पारंपारिक कपड्यांना अधिक पसंती दिली जाते. विशेष करून तरुण-तरुणी पारंपारिक कपडे परिधान करून गरबा रास दांडिया कार्यक्रमास हजेरी लावतात. नऊ दिवस नऊ पद्धतीचे पोशाख खरेदी करणे प्रत्येकास शक्य नसते. यास पर्याय म्हणून अनेक जण



भाड्याने पारंपरिक कपडे घेऊन दांडिया खेळण्याचा आनंद लुटतात. ८० टक्के महाविद्यालयीन तरुण-तरुणींचा यात सहभाग असतो. दोन ते अडीच वर्षाच्या तुलनेत यंदा भाड्याने कपडे घेण्याचे प्रमाण वाढले आहे. आत्तापासूनच मागणी सुरू झाली आहे. उत्सवाच्या चार ते पाच दिवस अगोदर आणखी तीस ते पस्तीस टक्के मागणी वाढून संपूर्ण उत्सवात चाळीस ते पन्नास टक्के मागणी वाढण्याची शक्यता व्यावसायिकांनी व्यक्त केली आहे. सध्या दरवर्षीच्या तुलनेत कपड्यांमध्ये १५ टक्के दरवाढ केली असल्याची माहिती अथर्व ड्रेपरीच्या सोनिया गवंडी यांनी दिली.चनिया चोली, केडिया, धोती सूट, इंडो वेस्टर्न अशा विविध प्रकारचे पारंपारिक पोशाखाना मागणी आहे. सध्या दांडिया गरबाचे क्लासेस सुरू असल्याने १५ टक्के मागणी झाली आहे. नऊ दिवस नऊ पद्धतीचे पोशाख खरेदी करणे प्रत्येकास शक्य नसते. यास पर्याय म्हणून अनेक जण भाड्याने पारंपरिक कपडे घेऊन दांडिया खेळण्याचा आनंद लुटतात. ८० टक्के महाविद्यालयीन तरुण-तरुणींचा यात सहभाग असतो.सण- उत्सवामध्ये पारंपारिक कपडे भाड्याने घेण्याचा अनेक वर्षाचा ट्रेड आहे. आजच्या युगातही तो टिकून आहे. उलट काही अंशी त्यात वाढ झाली आहे.

# इनकमिंग -आउटगोइंगला सुरुवात

## एकनाथ पवार लवकरच शिवबंधन हबांधणार असल्याची माहिती

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** येत्या काही महिन्यांमध्ये लोकसभेसह विधानसभेच्या निवडणुका आहेत. निवडणुकांच्या तोंडावर पिंपरी-चिंचवड शहरामध्ये इनकमिंग व आउटगोइंगला सुरुवात झाली आहे. ऐन निवडणुकांच्या तोंडावर भाजपला धक्का बसणार असून शहरातील भाजपचे माजी सत्तारूढ पक्षनेते तथा प्रदेश प्रवक्ते एकनाथ पवार उद्धव ठाकरे यांच्या गळाला



लागले आहेत. येत्या काही दिवसांत ते मुंबईमध्ये मातोश्रीवर शिवबंधन हाती बांधणार असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांनी दिली आहे. भाजपचे प्रदेश प्रवक्ते पवार हे नितीन गडकरी यांचे विश्वासू मानले जातात. त्यांनी २०१४ मध्ये भोसरी विधानसभेतून निवडणूक लढवली होती. त्यावेळी त्यांनी तब्बल ५२ हजार मते घेतली होती. पुढे महेश लांडगे भाजपमध्ये आल्याने त्यांना विधानसभा लढवण्याची संधी मिळाली नाही. मात्र, निवडणूक लढवण्याची त्यांची सुप्त इच्छा लपून राहिली नाही. पिंपरी-चिंचवड शहरात संधी मिळत नसल्याने त्यांनी गेल्या चार वर्षांपासून लातूर लोकसभेत येणाऱ्या लोहा-कंधार या विधानसभा मतदारसंघात लढण्याची तयारी केली आहे. तेथे सध्या शेकापचे श्यामसुंदर शिंदे आमदार आहेत. शेकाप खालोखाल त्या मतदारसंघात शिवसेनेचे वर्चस्व आहे. त्यामुळेच एकनाथ पवार यांनी ठाकरे गटात प्रवेश करण्याचे निश्चित केले आहे. येत्या काही महिन्यांमध्ये लोकसभेसह विधानसभेच्या निवडणुका आहेत. शहरामध्ये इनकमिंग व आउटगोइंगला सुरुवात झाली आहे.

### पवार गडकरींचे खंदे समर्थक

**» एकनाथ पवार हे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे खंदे समर्थक मानले जातात. त्यांनी २०१४ ला भोसरी विधानसभा लढवली होती. त्यावेळी त्यांना ५२ हजार मते पडली होती. त्यानंतर त्यांनी मागच्या वेळी महापालिकेत सभागृह नेते म्हणून काम पाहिले होते. गेले अनेक दिवस ते भाजप सोबत एकनिष्ठ आहेत. मात्र त्यांनी भाजप सोडण्याचा निर्णय घेतल्याने भोसरीमध्ये भाजपला धक्का देखील बसू शकतो, अशी शक्यता वर्तवली जात आहे.**

# नवरात्रोत्सव : बाजारपेठेत खरेदीचा उत्साह!

## बाजारात पूजेचे साहित्य, दागिने, कपड्यांची मोठी आवक

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** गणेशोत्सवा नंतर वेध लागतात ते नवरात्रोत्सवाचे. उद्या म्हणजेच १५ ऑक्टोबर रोजी नवरात्रारंभ घटस्थापना होणार असून, विजयादशमीपर्यंत हा उत्साह पाहता येणार आहे. देवीच्या आगमनाची जय्यत तयारी सुरु असून, बाजारही विविध वस्तूंनी सजला आहे. खरेदीसाठी नागरिकांमध्ये उत्साह पाहावयास मिळत आहे. देवीच्या पूजेचे साहित्य तसेच कपडे, सजावटीच्या साहित्यांची बाजारात मोठ्या प्रमाणात आवक झाली आहे.

त्यामुळे बाजारपेठांमध्ये ग्राहकांची गर्दी वाढत असल्याचे चित्र आहे. आकर्षक रोषणाईने शहरातील मंदिर परिसर उजळून निघाला आहे. आश्विन महिन्याच्या पहिल्या दिवसापासून नवरात्रीला सुरवात होते. शहरात घरोघरी तसेच सार्वजनिक मंडळांमार्फत अनेक ठिकाणी देवीच्या मूर्तीचे तसेच प्रतिमेचे पूजन केले जाते.



घटस्थापना झाल्यानंतर नऊ दिवस देवीच्या नऊ रूपांची मोठ्या भक्तिभावाने आराधना होत असते. या कालावधीत नवरात्रीमध्ये बाजारात मोठी उलाढाल होते. १५ ऑक्टोबरपासून शारदीय नवरात्रीला सुरवात होत असून, त्या निमित्ताने दोन दिवस आधीच सर्वत्र खरेदीची धामधूम सुरू आहे. नवरात्रीचा उपवास करणारा वर्गही मोठ्या प्रमाणावर असल्याने बाजारांमध्ये फळांसह रताळेही दाखल झाले आहेत. देवीच्या पूजेच्या साहित्यापासून टिपऱ्यांपर्यंत नानाविध वस्तू नवरात्रीसाठी शहरात दाखल झाल्या आहेत. घटस्थापनेसाठी लागणारी कामट्यांची टोपली, माती, मातीचे घट, सात प्रकारचे धान्य, मखमली आणि झेंडूची फुले, घट बांधण्यासाठी दोरा, करंडा फणी, ओढणी, कापसाचे वस्त्र हे साहित्य खरेदी करण्यासाठी महिलांनी गर्दी केली होती. या सर्व वस्तू ५ रुपयांपासून २५ रुपयांपर्यंत उपलब्ध आहेत. नवरात्रामध्ये अनेक कुटुंबांमध्ये देवघरात अखंड दिवा तेवत ठेवला जातो. यासाठी खास दिवेही बाजारात दाखल झाले आहेत. पूजेच्या साहित्यासह विविध रंगांतील टिपऱ्याही पहायला मिळत आहेत.

घटस्थापना करण्यासाठी लागणारी मातीची मटकी बाजारात विक्रीसाठी उपलब्ध असून, ही मटकी आकर्षक व सुंदर दिसावीत यासाठी त्यावर कुंदन टिकल्या लावून आकर्षक सजावट करण्यात आली आहे; तर घटासाठी लागणारे धान्य व माती तसेच टोपल्यांचीदेखील विक्री करण्यात येत आहे. बाजारात दाखल झालेल्या दांडिया, नवनवीन कपडे, दागिन्यांनी नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. सुंदर नक्षीकाम केलेले आकर्षक घागरे, चनिया-चोली, साड्या, कवड्या, काचा, मणी यांचा वापर करून तयार केलेल्या दागिन्यांनी बाजार फुलले आहेत. बाजारात शोभेच्या काचा आणि मोत्यांनी सजवलेले घट दिसू लागले असून, वर्क केलेली घागरा-चोली, कुर्ता-पायजमा, बांधणी ड्रेस-साड्या आणि त्यावर साजेल अशी आभूषणे आहेत.

### देवीच्या स्वागताची जंगी तयारी

**» सार्वजनिक नवरात्र उत्सव मंडळांनी देवीच्या स्वागताची जंगी तयारी केली असून, अनेक ठिकाणी देवीच्या मूर्तीचे आगमनही झाले आहे. या ठिकाणांवर गरब्याचे आयोजन करण्यात येणार असल्याने तरुणांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. मंडळाचे कार्यकर्ते मोठ्या भक्ती भावाने कार्यमग्न झालेले पाहावयास मिळत असून, रस्त्यावर होणाऱ्या आकर्षक रोषणाईने आसमंत उजळून निघाला आहे.**

# पालकमंत्री अजित पवारांनी केली ससूनच्या अधिष्ठाताची कानउघाडणी!

## आरोग्य सुविधांकडे दुर्लक्ष झाल्यास कारवाई

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

ससूनच्या प्रवेशद्वारावर सापडलेले अमली पदार्थ आणि अमली पदार्थांचा तस्कर ललित पाटील पलायन प्रकरणी उपमुख्यमंत्री आणि पालकमंत्री अजित पवार यांनी ससूनचे अधिष्ठाता डॉ. संजीव ठाकूर यांना शुक्रवारी चांगलेच फैलावर घेतले. गैरप्रकारांना कोण जबाबदार आहे, असे विचारत ससून प्रशासनाच्या कार्यपद्धतीविषयी प्रश्नचिन्हं उपस्थित केले. आता निर्णय घेण्याची वेळ आल्याचा गर्भित इशारा पवार यांनी या वेळी दिला. ससून रुग्णालयातील अमली पदार्थांच्या प्रकरणानंतर रुग्णालयातील अनेक प्रकरणे समोर आली. रुग्णालयातील कैद्यांच्या कक्षात अनेक कैदी महिनोंमहिने पाहुणचार घेत असल्याचेही यानिमित्ताने समोर आले. उपमुख्यमंत्री अजित पवार हे पालकमंत्री झाल्यानंतर प्रथमच त्यांनी पुण्यात येऊन विविध विकासकामांचा आढावा घेतला. त्यामध्ये शहरासह जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणेचाही आढावा घेतला. या बैठकीला विभागीय आयुक्त सौरभ राव, जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख, ससून रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. ठाकूर, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नागनाथ यमपल्ले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रामचंद्र हंकारे आदी उपस्थित होते. या बैठकीसाठी नियोजनात सकाळी ११ ते १२ अशी वेळ देण्यात आली होती. या एका तासात पुणे, पिंपरी-चिंचवड आणि उर्वरित ग्रामीण भागातील आरोग्य यंत्रणेचा आढावा घेण्यात येणार होता. पालकमंत्री पवार यांनी बैठकीच्या सुरुवातीला ससूनचे अधिष्ठाता डॉ. ठाकूर यांच्याकडे मोर्चा वळवला. पुढील २५ मिनिटे पवार यांनी ससून प्रशासनाला धारेवर धरले.

ससूनमध्ये घडलेल्या घटनेला कोण जबाबदार आहे, असा सवाल त्यांनी केला. त्यावर डॉ. ठाकूर यांनी थातूरमातूर उत्तरे देण्याचा प्रयत्न केला. त्यावर पवार यांचे समाधान झाले नाही. त्यानंतर पवारांनी वृतपत्रांत प्रसिद्ध झालेल्या बातम्या वाचून दाखविल्या. तसेच आता निर्णय घेण्याची वेळ आल्याचा इशाराही या वेळी दिला.

आरोग्य सुविधांसाठी राज्यस्तरावरून अधिकचा निधी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आवश्यकता असल्यास जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातूनही निधी देण्यात येईल. जिल्ह्यातील सर्व शासकीय रुग्णालयांनी औषधाची कमतरता भासणार नाही, याची दक्षता घ्यावी. येत्या मार्चअखेरपर्यंत दोन्ही महापालिका क्षेत्रात खाटांची संख्या वाढवावी. ससून रुग्णालयात अत्याधुनिक उपचार उपलब्ध करून देण्यात आले असून, त्याचा सर्वसामान्य रुग्णाला लाभ झालाच पाहिजे. यात दुर्लक्ष झाल्यास संबंधितांवर कडक कारवाई करण्यात येईल.




### अधिष्ठातांनी पळ काढला

» वाढत्या रुग्णसंख्येला आवश्यक उपचार, औषधे पुरेशी आहेत का, अवघड शस्त्रक्रिया शासकीय सुविधा, मनुष्यबळ याबाबत पालकमंत्र्यांनी आढावा घेतला, बैठकीनंतर एवढीच माहिती पत्रकारांना देऊन ससूनचे अधिष्ठाता डॉ. ठाकूर यांनी अधिक बोलण्यास नकार देत गाडीत बसून पळ काढला.

# ‘लाडक्या लेकी’च्या सक्षमीकरणासाठी सरकारची संरक्षणाची सावली

## पिंपरी-चिंचवड भाजपा महिला आघाडीतर्फे फडणवीस यांचे अभिनंदन

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

राज्याच्या सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेली लेक लाडकी योजना राज्यात लागू करण्याचा निर्णय महायुती सरकारच्या मंत्रिमंडळ बैठकीत झाल्याने महिला सक्षमीकरणाच्या महाराष्ट्राच्या परंपरेत मानाचा नवा तुरा खोवला गेला आहे. केवळ कागदी धोरणे आणि वारेमाप घोषणा करण्याची परंपरा मोडीत काढून घोषणांची अंमलबजावणी करणाऱ्या महायुती सरकारने घेतलेल्या या निर्णयामुळे राज्यातील असंख्य गरीब कुटुंबांतील मुलींचे भविष्य उजळणार आहे, असा विश्वास भाजप महिला आघाडीच्या सौ. सुजाताताई सुनिल पालांडे यांनी व्यक्त केला आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वित्तमंत्री या नात्याने राज्याचा अर्थसंकल्प सादर करताना ‘लेक लाडकी’ योजनेचा तपशील जाहीर केला होता. आंतरराष्ट्रीय कन्या दिनाच्या पूर्वसंध्येस आणि दुर्गा उत्सवाच्या पार्श्वभूमीवर ही योजना जारी करून देवेंद्र फडणवीस यांनी या संकल्पाची पूर्तता केली आहे, असे त्या म्हणाल्या. मुलींच्या सक्षमीकरणासाठी आणि गरीब कुटुंबांतील मुलींना लखपती बनवून स्वतः च्या क्षमतेवर शिक्षणाच्या सर्व संधी प्राप्त करता याव्यात यासाठी आखलेल्या या योजनेद्वारे वयाच्या १८ व्या वर्षी मुलीच्या खात्यात एक लाखांपर्यंतची रक्कम जमा करण्यात येणार आहेत. महिलांना एसटी प्रवासात पन्नास टक्के सवलत देण्याच्या क्रांतिकारी निर्णयामुळे राज्यातील महिलांच्या सक्षमीकरणाचा मोठा टप्पा गाठला गेला आहे. केंद्रातील मोदी सरकारने अलीकडेच महिलांना राजकीय आरक्षण जाहीर करून समान संधींचे वचन पूर्ण केले आहे. लेक लाडकी योजनेमुळे राज्यातील गरीब कुटुंबात जन्माला येणाऱ्या कोणत्याही मुलीच्या शैक्षणिक प्रगतीत आर्थिक अडचणीचा अडथळा येणार नाही. भावी पिढीतील मुलींच्या सक्षमीकरणाची दमदार प्रक्रिया लेक लाडकी योजनेतच्या क्रांतिकारी अंमलबजावणीतून सुरू झाली आहे, असे सौ. सुजाताताई सुनिल पालांडे म्हणाल्या. महाराष्ट्राच्या लेकींना आत्मनिर्भर करणारी ही दूरदर्शी योजना आखल्याबद्दल राज्यातील महिलावर्गाच्या वतीने आपण उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन करतो, असे त्या म्हणाल्या.



### DBT द्वारे लाभार्थी रक्कम अदा होणार

» पिवळ्या व केशरी रेशनकार्डधारक कुटुंबात मुलीचा जन्म झाल्यावर ५ हजार रुपये, इयत्ता पहिलीत गेल्यावर ६ हजार रुपये, सहावीत गेल्यावर ७ हजार रुपये, ११ वीत गेल्यावर ८ हजार रुपये, १८ वर्षे पूर्ण झाल्यावर ७५ हजार रुपये, अशा रितीने एकूण त्या मुलीस १ लाख १ हजार रुपये एवढा लाभ मिळेल. शासनामार्फत थेट लाभार्थी हस्तांतरण (इढ) द्वारे लाभाची रक्कम लाभार्थ्यांना अदा करण्यात येणार आहे. १ एप्रिल २०२३ नंतर कुटुंबात जन्मणाऱ्या १ अथवा २ मुलींना त्याच प्रमाणे १ मुलगा व १ मुलगी असल्यास मुलीला या योजनेचा लाभ मिळेल. दुसऱ्या प्रसुतीच्या वेळी जुळी अपत्ये जन्माला आल्यास त्यापैकी १ मुलगी किंवा दोन्ही मुली असल्यास दोघींना या योजनेचा लाभ मिळेल, अशी माहितीही महिला मोर्चा अध्यक्षा सौ. सुजाताताई सुनिल पालांडे यांनी यावेळी दिली.

# भिडे पूल परिसरात पुढील दोन महिने वाहतूक बदल!

## महापालिकेकडून पावसाळी वाहिनी टाकण्याचे काम सुरू

**पुणे | न्यूज एक्सप्रेस मराठी।** डेक्कन जिमखाना भागातील पीएमपी स्थानक ते भिडे पूल दरम्यान महापालिकेकडून पावसाळी वाहिनी टाकण्याचे काम सुरू करण्यात येणार आहे. या भागातील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी पुढील दोन महिने वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात येणार आहेत. गरज भासल्यास केळकर रस्तामार्गे भिडे पुलावरुन डेक्कन जिमखान्याकडे जाणारी वाहतूक बंद ठेवण्यात येणार आहे.

डेक्कन जिमखाना येथील पीएमपी स्थानक ते भिडे पूल दरम्यान पावसाळी वाहिनी टाकण्याचे काम सोमवारपासून (१६ ऑक्टोबर) सुरू करण्यात येणार आहे. हे काम



साधारणपणे १५ डिसेंबरपर्यंत सुरु राहणार आहे. गरज भासल्यास केळकर रस्तामार्गे भिडे पुलावरुन डेक्कन जिमखान्याकडे जाणारी वाहतूक बंद करण्यात येणार आहे, असे वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त विजयकुमार मगर यांनी कळविले आहे. केळकर रस्तामार्गे डेक्कन जिमखान्याकडे जाणाऱ्या वाहनचालकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा, असे आवाहन मगर यांनी केले आहे. केळकर रस्त्यावरुन जंगली महाराज रस्त्याकडे जाणारे , तसेच जंगली महाराज रस्त्यावरुन केळकर रस्तामार्गे नारायण पेठेकडे येणाऱ्या वाहनचालकांनी शक्यतो गाडगीळ पुलाचा (झेड ब्रीज ) वापर करावा. भिडे पूल, सुकांता हॉटेल, खाऊ गल्लीमार्गे जंगली महाराज रस्त्याने वाहनचालकांनी इच्छितस्थळी जावे.

### १५ डिसेंबरपर्यंत सुरु राहणार काम

» गरज भासल्यास केळकर रस्तामार्गे भिडे पुलावरुन डेक्कन जिमखान्याकडे जाणारी वाहतूक बंद ठेवण्यात येणार आहे. डेक्कन जिमखाना येथील पीएमपी स्थानक ते भिडे पूल दरम्यान पावसाळी वाहिनी टाकण्याचे काम सोमवारपासून (१६ ऑक्टोबर) सुरू करण्यात येणार आहे. हे काम साधारणपणे १५ डिसेंबरपर्यंत सुरु राहणार आहे. गरज भासल्यास केळकर रस्तामार्गे भिडे पुलावरुन डेक्कन जिमखान्याकडे जाणारी वाहतूक बंद करण्यात येणार आहे, असे वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त विजयकुमार मगर यांनी कळविले आहे. केळकर रस्तामार्गे डेक्कन जिमखान्याकडे जाणाऱ्या वाहनचालकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा, असे आवाहन मगर यांनी केले आहे.

# अधिष्ठात्यांपासून शिपायांपर्यंत सगळे चौकशीच्या फेऱ्यात

## चौकशी समितीने केली रुग्णालयाच्या व्यवस्थापनाची झाडाझडती

**पुणे | न्यूज एक्सप्रेस मराठी।** ससून रुग्णालयातील कैदी पलायनप्रकरणी चौकशीसाठी नेमलेल्या समितीने शुक्रवारी रुग्णाल याच्या व्यवस्थापनाची झाडाझडती घेतली. रुग्णालयाचे अधिष्ठाता, वैद्यकीय अधीक्षक, कक्ष क्रमांक १६ मधील कर्मचारी यांची समितीने कसून चौकशी केली. याचबरोबर २०२० पासून आतापर्यंत रुग्णालयात दाखल झालेल्या प्रत्येक कैदी रुग्णाची माहिती समितीने मागितली आहे.

ससून रुग्णालयातून अमली पदार्थ तस्करी प्रकरणाचा सूत्रधार ललित पाटील याने पलायन केल्याच्या प्रकरणाची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे राज्य सरकारने चार जणांची चौकशी समिती नियुक्त केली आहे. या




समितीच्या अध्यक्षपदी वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाचे प्रभारी संचालक डॉ. दिलीप म्हैसेकर आहेत. समितीच्या सदस्यपदी सोलापूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख, नांदेडमधील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील न्यायवैद्यकशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. हेमंत गोडबोले आणि मुंबईतील ग्रँट शासकीय वैद्यकीय महा विद्यालयातील अस्थिव्यंगोपचार विभागाचे प्रमुख डॉ. एकनाथ पवार हे आहेत. समितीने शुक्रवारी सकाळीच ससूनमध्ये हजेरी लावली. समितीने अधिष्ठाता कार्यालयात चौकशी सुरू केली. अधिष्ठाता डॉ. संजीव ठाकूर यांची समितीने चौकशी केली.

त्यानंतर वैद्यकीय अधीक्षक डॉ. किरणकुमार जाधव, कैदी रुग्ण समितीचे अध्यक्ष डॉ. सुजीत धिवारे, कैदी रुग्णांवर उपचार करणारे डॉक्टर, कैदी कक्ष क्रमांक १६ मधील कर्मचाऱ्यांची चौकशी करण्यात आली. अधिष्ठाता, वैद्यकीय अधीक्षक आणि कैदी रुग्ण समिती अध्यक्षांना याप्रकरणी लेखी अहवाल देण्यास समितीने सांगितले आहे.

याचबरोबर २०२० पासून आतापर्यंत ससून रुग्णालयात दाखल झालेल्या कैदी रुग्णांचा अहवाल समितीने मागितला आहे. त्यात कैदी रुग्ण, त्यांचा आजार, उपचार, रुग्णालयात दाखल असलेला कालावधी, उपचार करणारे डॉक्टर आदी माहितीचा समावेश आहे, असे सूत्रांनी सांगितले.

### ससूनच्या चौकशीचा फेरा

- » अधिष्ठात्यांपासून शिपायापर्यंत चौकशी
- » वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून लेखी अहवाल मागविला
- » रुग्णालयात २०२० पासून आतापर्यंत दाखल कैदी रुग्णांचे अहवाल
- » रुग्णांवर उपचार करणाऱ्या डॉक्टरांचीही चौकशी
- » कैदी रुग्ण समितीच्या नियुक्तीबाबतही विचारणा